## प्रकरण-2 (पुस्तिका-1) 4(1)(ख)(1)

### उप प्रमुख अभियंता (पापुप्र) यांत्रिकी व विद्युत -शहर

### प्रस्तावना संस्था, संस्थेची कामे व कर्तव्ये यांचा तपशील

**2.1 लोकप्राधिकरणाची उद्दिष्टे व हेतू :-**

नवीन जलस्त्रोताबाबतची कामे, नवीन जलवाहिन्या टाकणे, त्याकरिता बोगदे, भुयारे इ. ची बांधणी सेवाजलाशयासह अधिकाधिक पाणी आणून त्याच्या समान वितरणाकरिता टाकण्यात येणा-या जलवाहिन्या, नवीन उदंचन केंद्रे, विद्युत उपकेंद्रे, हरिणीकरण संयंत्रांसह जलशुद्धिकरण प्रक्रिया केंद्रे इ.च्या बांधणी, पुनर्बांधणीच्या तसेच त्यासंबंधीत सर्व कामांसाठी आवश्यक असणारे यांत्रिकी व विद्युत घटकांबाबतचे नियोजन व बांधणी उभारणी करणे.

**2.2 विशेष कार्य / कल्पना (नियोजन) :-**

मुंबई शहराच्या विविध मोठ्या भागांना सर्वोच्च प्रतीच्या पिण्याच्या स्वच्छ पाणी पुरवठ्यात समान प्रमाणात वाटप होण्यासाठी वृद्धी करणे.

**2. 3 इतिहास व माहितीचा संदर्भ :-**

मुंबई शहर व उपनगरांचा जसा विस्तार होऊ लागला तसा पाण्याचा अतिरिक्त पुरवठा करण्याकरिता हाती घ्यावयाच्या नवीन पाणी पुरवठा प्रकल्पांसाठी प्रमुख अभियंता (पूर्वीचे नांव प्रकल्प अभियंता) असा वेगळा विभागच स्थापन करण्याची गरज भासली. या प्रकल्पांच्या कामांमध्ये जलस्त्रोताच्या विकासापासून ते उच्चतम दर्जाचे पाणी शहर, पूर्व आणि पश्चिम उपनगरांमधील जलाशयापर्यंत आणण्याकरिता केंद्र सरकार व राज्य सरकारकडून घ्याव्या लागणा-या विविध मान्यता/मंजूरी, भूसंपादनापासून ते संपूर्ण व्यवस्थेची संकल्प चित्रे तयार करणे इ. गोष्टींचा अंतर्भाव होतो. सध्याच्या पाणी पुरवठा प्रकल्पांमध्ये ब-याचशा यांत्रिकी व विद्युत घटकांचा उदा. विद्युत उपकेंद्रे, उदंचन संयंत्रे, हरिणीकरण संयंत्रे, प्रक्रिया संयंत्रे विभागातील प्रकाशाची सोय, जलवाहिन्यांमधील झडपा, जोडणीची इतर कामे तसेच संलग्न सेवा जसे उद्वाहन, वातानुकुलन,संपर्क सुविधा इ.चा समावेश आहे.

उप प्रमुख अभियंता (पा.पु.प्र) यां. व वि.-शहर यांच्या विभाग खात्यातील कर्मचारी अधिकारी किंवा प्रकल्प सल्लागार यांच्या सहकार्याने वरील कामांचे नियोजन करून ती कामे प्रत्यक्ष पार पाडतात.

## 2.4 कर्तव्ये

नियोजन, संकल्पचित्रे, अंदाज, निविदेबाबतची कागदपत्रे, निविदा मागविणे, कागदपत्रांची छाननी, प्रत्यक्ष कार्यादेश देणे, खाते व बाहेरील संस्था उदा.विद्युतपुरवठा मंडळ, महामार्ग प्राधिकरण, एमटीएनएल, विद्युत निरीक्षक इ.चा समन्वय साधणे, कंत्राट शर्तीनुसार सदर कामे नियत वेळेत पूर्ण करणे व कंत्राट शर्तीनुसार नमूद केलेले व या प्रतीचे काम पूर्ण करणे हे या विभागातील कर्मचा-यांचे मुख्य कर्तव्य आहे. तसेच कामाच्या प्रगतीबाबतची व पूर्ण झालेल्या या कामांची कागदपत्रे जतन करणे व त्याबाबतचे मासिक/त्रैमासिक अहवाल सादर करणे हे ही सदर कर्मचा-यांचे कर्तव्य आहे.

## 2. 5 मुख्य कामे / कार्य :-

प्रमाणभूत दर्जाचे पाणीपुरवठा सबंधीत विविध प्रकल्प टप्प्याटप्प्याने राबविणे.

## 2.6 पुरविण्यात येणा-या सेवांची यादी :-

उपप्रमुख अभियंता (पापुप्र) यांत्रिकी व विद्युत-शहर

1. पवई तलावात झिरपणारे मलजल थांबविण्याकरीता आणि पवई तलावाचे सुशोभिकरण करण्याचे काम करण्याकरीता सल्लागार नेमणेबाबत.

2. मुंबई शहरातील पवई तलावाचे सुशोभिकरण करणे घटक-2 पवई तलावाच्या परिघाभोवती विद्युत एलईडी दिव्यांची, सुरक्षा यंत्रणा संलग्न स्थापत्य कामासहित विकसित करणे.

3. विहार येथे 90 द.ल.लि. क्षमतेच्या जलप्रक्रीया केंद्राचे प्रचालन आणि परिरक्षण अंतर्भूत धरुन जलप्रक्रीया केंद्राची स्थापत्य, यांत्रिकी व विद्युत कामे.

4. पवई तलाव येथे आदीशंकराचार्य मार्गाकडील गणेशघाट ते पोवार वाडी पर्यंत विकसित केलेल्या लेक फ्रन्ट कामांचे परिरक्षण व परिचालन करण्याचे काम करण्याकरीता कंत्राटदाराची नेमणूक करणे.

5. पवई तलाव पुनरुज्जीवन करण्याअंतर्गत घटक- 3 नुसार पवई तलावात वायुवीजन व पाण्यात विरघळलेल्या प्राणवायुचे मापन करण्यासाठी यंत्रणेचा पुरवठा, उभारणी व कार्यान्वित करणे व तलावाचे दरवाजे (Penstock) बदलणे.

6. प-लोमीटर्सचा पुरवठा, स्थापना, चाचणी, कमिशर्निंगकरीता निविदा.

.

**2.7 संरचनात्मक तक्ता :-**

उपप्रमुख अभियंता (पापुप्र) यांत्रिकी व विद्युत-शहर

| | | |
|---|---|---|
| कार्यकारी अभियंता (पापुप्र) यां. व वि.2 | कार्यकारी अभियंता (पा.पु.प्र.) ( यां.व वि.) - 3 | कार्यकारी अभियंता (पा.पु.प्र.) स्थापत्य |
| सहायक अभियंता - 2 | सहायक अभियंता - 1 | सहायक अभियंता - 1 |
| दुय्यम अभियंता - 1 | दुय्यम अभियंता - 2 | दुय्यम अभियंता - 2 |
| कनिष्ठ अभियंता - 1 | कनिष्ठ अभियंता - 2 | कनिष्ठ अभियंता - 2 |
| | मुख्य लिपिक - 1 | |
| | लिपीक 2 (रिक्त पद) | |
| | टंकलेखक -1 (रिक्त) | |

**2.8 जनतेकडून अपेक्षा :-**

सदर कामे पार पाडताना होणा-या गैरसोयी सहन करणे.

2. 9 जनतेच्या सहभागाच्या योजना :-

याकरीता कोणतीही वेगळी योजना नसली तरीही नागरीकांना सदर प्रकल्प कामांना भेटी द्यावयाच्या असल्यास त्याकरीता त्यांच्या खर्चाने योग्य परवानगीसह भेटींचे आयोजन करता येईल.

2.10 सेवा पुरविण्याची संरचना व जनतेच्या तक्रारी :-

ही बाब प्रकल्प कामांबाबत लागू होत नाही. तरीही नागरीकांच्या काही तक्रारी असल्यास निर्देशित अधिकारी त्याबाबत लक्षपूर्वक ऐकून त्यावर उत्तर देतील.

सही/-

उप प्रमुख अभियंता (पापुप्र) यां.व वि.-शहर